ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– II

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

# गुरूदेव रानडे यांच्या साक्षात्कारवादाच्या तत्वज्ञानावर वेदांत व सांख्य दर्शनांचा प्रभाव

*डॉ. अनघा गोडसे,

गुरूदेव रानडे (१८८६-१९५७) विसाव्या शतकातील थोर साक्षात्कारी संत व द्रष्टे तत्वज्ञ होते. त्यांनी आपले पूर्ण आयुष्य 'देव' या संकल्पनेच्या शोधात व्यतित केले. लौकिक, प्रापंचिक जीवन व पारमार्थिक जीवन यांत नेहमीच समतोल साधला. मुळातच भक्तीमार्गाकडे कल असून, निर्गुण स्वरूपाचे चिंतन, परमानंदाची प्राप्ती, त्यासाठीची साधना व आत्मसाक्षात्कार हेच त्यांचे ध्येय होते. कुशाग्र बुद्धीमत्तेने व शिक्षण क्षेत्रातील यशामुळे (विद्यार्थी, अध्यापक, प्राध्यापक सर्वच स्तरांवर) आयुष्यात अधिकाधिक सखोल ज्ञानाकडे ते प्रवृत्त झाले. आपल्या व्यासंगाने, प्रतिभेने आणि सौजन्याने अलाहाबाद विश्वविद्यालयात प्राध्यापक ते कुलगुरू अशी पदे भूषविली. त्यांनी तेथील तत्वज्ञान विभागाला एक निराळीच प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. त्या काळांत त्यांनी वर्गात दिलेली अनेक अंतःस्फूर्त व आत्मप्रत्ययी व्याख्याने, विद्यार्थ्यांना तत्वज्ञान या विषयाची रूची वाढविणारी व आत्मचिंतनाकडे प्रवृत्त करणारी असत.

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

## गुरूदेव रानडे यांचे तत्वज्ञान- साक्षात्कारवाद (Rational Mysticism):

अध्यात्मिक जीवनाचा अनुभव घेणे ही अंतःकरणाची खरी ओढ असल्याने त्यांनी स्वतःला बौद्धिक व तत्वज्ञानपर कार्याला वाहून घेतले होते. ते स्वतः तत्वज्ञान जगत होते. गुरूदेव रानडे म्हणतात, " परमार्थावरील माझ्या श्रद्धेचा आधार माझा आत्मानुभव हा होता. त्याला तर्काची जरूर नव्हती, पण साक्षात्काराचे तत्वज्ञान आधुनिक जगाला पटावे व उपयोगी पडावे यासाठी ही श्रद्धा आधुनिक तत्वज्ञानाच्या दृष्टीनेही तर्कशुद्ध आहे, हे दाखविणे आवश्यक आहे."

आपल्या बुद्धीला जे पटेल, जे जाणवेल, ज्यांचा आपल्याला साक्षात्कार झाला, अनुभव आला, तेवढेच आपले तत्वज्ञान असावे असे त्यांचे मत होते.

ईश्वराचा साक्षात्कार ही एक प्रकारची मनाची प्रवृत्ती असून प्रत्यक्ष, तात्कालिक, इंद्रियातीत अनुभवजन्य ईश्वराचा साक्षात्कार म्हणजेच अनुभूति होय. हे अत्यंत शांततेने, स्तब्धपणे भक्तीपूर्वक अंतःकरणाने केलेले ईश्वराचे ध्यान होय. ईश्वरात रममाण होणे, लीन होणे अभिप्रेत आहे. अनुभूतीचे किंवा अध्यात्मिक अनुभवाचे वर्णन करणे अशक्य आहे. कारण ती अनुभूती इंद्रियांपासून मिळणाऱ्या ज्ञानापलीकडील आहे. बुद्धी, संवेदना व इच्छाशक्ती/ क्रियाशक्ती या तिन्ही गोष्टींच्या सहित इंद्रियातीत अशा प्रज्ञाशक्तीचा ( intuition- प्रातिभज्ञान) आधार अत्यंत गरजेचा आहे. पण ही अतींद्रिय शक्ती भिन्न नसून वरील तिन्हींमध्ये ओतप्रोत भरलेली आहे. याच्या साह्याने ईश्वराचा पूर्ण साक्षात्कार अनुभवणे शक्य आहे. त्याचा साक्षात् प्रत्यक्ष व तात्काळ अनुभव घेतल्यास कोणत्याही बाबतीत विचारांची उच्चतम श्रेणी गाठता येईल.

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– II Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

गुरूदेव रानडे या सिद्धहस्त विद्वानाने आपल्या गाढ अभ्यास, सखोल चिंतन, सूक्ष्म चिकीत्सक बुद्धी, प्रभावी सुंदर भाषा व समन्वय साधण्याची कला या गुणसंपदेने, पौर्वात्य व पाश्चिमात्य तत्वज्ञानाचा तौलनिक अभ्यास करून व त्यातील त्रुटी वगळून भारतीय तत्वज्ञान अत्यंत तर्कसुसंगत व पाश्चात्य पद्धतीनुसार इंग्रजी भाषेत मांडले. त्यासाठी पाश्चात्य भाषा शिकून मूळ ग्रंथांचा अभ्यास करून दोन्ही तत्वज्ञानांतील साम्य दर्शविणारे आपले विचार मांडले.

**वेदांत दर्शनाचा प्रभाव:**

संस्कृत भाषेवरील प्रेम व प्रभुत्व, तसेच उच्च बुद्धीमत्ता यामुळे वेद, उपनिषदे यांसारखे अनेक तत्वज्ञानावरील ग्रंथ तसेच संतवाङ्मय यासारखे अनेक ग्रंथ त्यांनी अभ्यासले. आदि शंकराचार्यांच्या अद्वैत वेदांताकडे ते आकर्षिले गेले. त्यातील भक्तीभावाच्या अंतर्भावाने त्यावर सखोल विचार करण्यास प्रवृत्त केले. अंतर्मुख होत त्यांनी आपल्या सर्व साहित्यात वेदांतील तत्वज्ञानाचा अंतर्भाव केला. जीवन, सत्य, ज्ञान यांच्या स्वरूपाविषयी असलेले ज्ञान, नैतिकता व साक्षात्कार यासंबंधी त्यांनी विस्ताराने लिहीले आहे.

आत्मा / ब्रह्म म्हणजेच परमसत्यतत्व हा उपनिषदांचा सिद्धांत आहे व तो गुरूदेव रानडे यांना मान्य आहे. आत्म्याच्या तुलनेत ईश्वर, विश्व कमी सत्य होत. ईश्वर व आत्मा यांचे तादात्म्य दाखवून आत्म्यापेक्षा निराळे व त्याच्या बाहेर काही नाही. आत्म्याचे ज्ञान म्हणजेच ब्रह्माचे ज्ञान. ब्रह्म सर्व विश्वात आहे व सर्व विश्व ब्रह्मात सामावलेले आहे. जे सत्यतत्व आहे, त्याचे आत्मा, ब्रह्म, स्वसंवित् हे स्वरूप आहे. परतत्व, स्वसंवेद्य, आत्मसाक्षी, आनंदमय अशा समाधीत साधक परतत्वाला पोचतो. उपनिषदांनुसार एकच शाश्वत निर्विकारी आत्मा सर्व विश्वात भरलेला आहे. शंकराचार्यांच्या मते केवल ब्रह्म हेच एकमेवाद्वितीय सत्य आहे. खरे तर आधुनिक विज्ञान सुद्धा हीच गोष्ट सिद्ध करण्यासाठी झटत आहे. विज्ञान हे तर्कसंगती व कारणमीमांसा यावर आधारित असते. प्राचीन ग्रंथपरंपरा सुद्धा देव, ईश्वर इ. संकल्पनांची माहिती देतात. परंतू चिंतन, ध्यान इत्यादिंच्या नियमित अभ्यासाने व सरावाने आलेले अतींद्रिय/ इंद्रियातीत असे ज्ञान (intuition) हे वरील दोहोंपेक्षा वरच्या स्तराचे असते. आपल्या स्वतःचा पारमार्थिक अनुभव हा देवाच्या अस्तित्वावर विश्वास ठेवायला भाग पाडतो. "देव आहे" हा अनुभव घेण्याचा विषय आहे, ते सिद्ध करण्याचा नाही. एकाच वेळी तो सर्वत्र आहे.

वेदांतात द्वैत, अद्वैत, द्वैताद्वैत, विशिष्टाद्वैत इ. अनेक मते आहेत. तशीच पाश्चात्य तत्वज्ञानातही आहेत. परंतू कोणतेही मत असत्य म्हणून न नाकारतां, त्याचा उच्चतम सिद्धांताशी समन्वय करून त्याला योग्य स्थान देण्यचे कार्य गुरूदेव रानडे यांनी आपल्या लेखनांतून केले. बुद्धिवादी थोर संत व्यक्तीलाच ते शक्य आहे. मानवाच्या अंतःकरणात असलेले सारभूत आत्मतत्व सर्वत्र भरलेले असल्यामुळेच सर्व विश्वात ऐक्य निर्माण होते.

गुरूदेव रानडे यांनी भगवद् गीतेला ईश्वरी साक्षात्काराप्रत नेणाारे तत्वज्ञान म्हटले आहे. त्याच्या मते संत ज्ञानेश्वरांनी सर्वप्रथम गीतेचा भावार्थ साक्षात्कारशास्त्र या दृष्टीने आपल्या ज्ञानेश्वरी या ग्रंथात मांडला आहे.

भगवद् गीतेच्या वेदांताच्या संदर्भातील विवरणात गुरूदेव रानडे म्हणतात, सगुण, निर्गुण व गुणातीत या तीनही प्रकाराने ब्रह्माचे वर्णन होऊ शकते. सर्व क्रियांचे ध्येय हे अंतिमतः परमानंद प्राप्त करणे हेच असते. " रसो वाही सः।" या उपनिषदातील वाक्याप्रमाणे अंती

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– II Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

रस देणारा (वस्तू), रस घेणारा (विषय), न उरता केवळ 'रस'च उरतो. थोडक्यात वरील तीनही सत्य आहेत. त्यात विरोध नाही. केवळ तर्काने न पटणारी त्याची ओळख साक्षात्काराच्या आधारे करून घेता येते. गुरूदेव रानडे यांची सर्व स्पष्टीकरणे वेदांतावर आधारित आहेत.

१) आत्मा वा अरे द्रष्टव्यः। - आत्मा म्हणजे वस्तू म्हणजेच स्वतःपेक्षा वेगळा असा वस्तूचा साक्षात्कार.हेच अंतर्यामी आत्म्याचे दर्शन आणि याचा अनुभव.

२) आत्मानाम् विजानियात् अयम् अस्मीति पुरूषः। - मी देह, पंचकोष नसून माझे खरे स्वरूप शुद्ध आत्मतत्व आहे याचा अनुभव.

३) अयम् आत्मा ब्रह्म। - जीवात्मा, परमात्मा, वस्तू व ब्रह्म यांचे ऐक्य. आत्मा व ब्रह्म दान्हीही अनंत आहे. 'अयमात्माब्रह्म' हे बृहदारण्यक उपनिषदातील वाक्य आत्मा व ब्रह्म एकच आहे असे दर्शविते. " पूर्णमदः पूर्णमिदं ...." हा ईशोपनिषदातील शांतिपाठही ब्रह्मात सर्व सामावलेले असून ते एकमेव सत्य आहे, असेच सांगतो.

४) अहम् ब्रह्मास्मि व तत्वमसि।- मी आत्मा व आत्माच ब्रह्म यावरून मीच ब्रह्म असे म्हणणे तर्कदृष्ट्या योग्य ठरते. त्याचप्रमाणे मी ज्ञाता ब्रह्म, म्हणून माझा विस्तार, आविष्कार जे ज्ञेय तेहि ब्रह्मच आहे असाही तर्क योग्य आहे.

५) सर्व खलू इदम् ब्रह्म ।- मी ब्रह्म, तू ब्रह्म, सर्वकाही ब्रह्म या निष्कर्षाला आपण आत्मचिंतनाचे सर्वोच्च शिखर मानू शकतो.

येथे गुरूदेव रानडे प्रत्येक टप्प्यावर ईश्वराबद्दलची मते बदलत जाऊन अंती सर्वत्र ब्रह्म आहे या मतापर्यंत येतात. संत तुकारामाचे उदाहरण देतात. प्रथम विठ्ठलाची सगुण रूपाची भक्ति व पुढे साक्षात्कार झाल्यावर सगुण रूप व अंतरातील दर्शन झालेले ईश्वराचे रूप एकच आहे असा अनुभव आल्यानंतर सर्वत्र देवाचेच रूप त्यांना दिसू लागले. प्रत्येक मनुष्यमात्र देव आहे हे पटले.

या पांच पारमार्थिक पायऱ्या त्यांनी सांगितल्या व वेदांत संप्रदायाचा समन्वय केला. प्रत्येक पायरी सत्य आहे असे सुचविले. त्यांनी आपल्या विवेचनात 'आत्मा' हा शब्द मी या अर्थी घेतलेला नाही. त्याचा अर्थ साक्षात्कारांत अनुभवाला येणारे आत्मतत्व असा आहे. यालाच ते 'वस्तू', ( बुद्धि आणि कल्पने पलीकडील आत्मतत्व) हा शब्द वापरतात. त्यांच्या मते 'सोहम्' हा 'तत्वमसि' पेक्षा वरच्या दर्जाचा अनुभव आहे. कारण स्वतःच्या शुद्ध अस्तित्वाची जाणीव ही देवाच्या अस्तित्वाच्या जाणीवेच्या वरच्या दर्जाची आहे. साक्षात्कारी संतांच्या अनुभवांवर लिहीलेल्या त्यांच्या सर्व साहित्यावर वेदांततत्वज्ञानाचा प्रभाव जाणवतो. त्यांच्या मते ऋग्वेदापासून सुरू झालेले साक्षात्कारशास्त्र अनेक शतकांपासून प्रगत होत गेलं व उपनिषदांनी ते सर्व विचार अजून विकसित केले.

गुरूदेवांनी साक्षात्काराला, अपरोक्षानुभूतीला बौद्धिक ज्ञानापेक्षा जास्त महत्व दिले, कारण ते बौद्धिक ज्ञानाच्या सीमा पार केल्यानंतर प्रातिभज्ञानाने प्राप्त होते. तेव्हाच 'सर्व खलू......' ही अद्वैतावस्था प्राप्त होते.

**सांख्य दर्शनाचा प्रभाव:**

सांख्य दर्शन हे एक नैसर्गिक व निरीक्षणांवर आधारित असे विज्ञानाधिष्ठीत असे शास्त्र मानले गेलेले आहे. सांख्य याचा अर्थ संख्या, ज्ञान असा केला जातो. हे ज्ञानावर आधारित आहे. हे पद्धतशीरपणे विकसीत केलेले आहे. सांख्यात 'पुरूष' हे प्रमुख अध्यात्मिक

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– II Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

तत्व मानले आहे. तसेच पुरूषाचे अनेकत्व मान्य केले आहे. तसेच पुरुष व प्रकृती या मूळ तत्वावर जगाच्या निर्मितीचे तत्वज्ञान उभारलेले आहे. त्यात कोणतेही देव किंवा तत्सम अनाकलनीय तत्व मानलेले नाही. जगाचे स्वरूप सत्य मानत वास्तववादी भूमिका घेतली आहे. ह्या ज्ञानाधिष्ठीत दर्शनाने जगाच्या भ्रामकतेची कल्पना नाकारलेली आहे.

गुरूदेव रानडे यांनी आपल्या बुद्धीवैभवाच्या आधारे त्याचे मूल्यांकन खालील प्रकारे केले आहे.

**वैश्विक -** 'महत्' हे एक वैश्विक तत्व असून त्यापासून बुद्धी हे मानसिक तत्व निर्माण होते. या दोन्ही तत्वांचे स्पष्टीकरण करताना अव्यक्त ते व्यक्त व व्यक्त ते अव्यक्त अशा प्रकारचे विवेचन केले आहे. हेतु व कारण या दोहोसंदर्भात अनुमान हे अव्यक्ताला सिद्ध करते. परंतू हे अनुमान व्यक्ताकडून अव्यक्ताकडे न जाता 'ज्ञ' म्हणजे अंतिम सत्याच्या ज्ञानाकडे जाते. या दोघांमध्ये अव्यक्ताचे काही कारण उरत नाही.

**मानसिक** - बुद्धी, लिंग शरीर, गुण इ. ना ' अहंकार' (ego) असे गणले गेले आहे. त्याचा नाश केल्यावर / झाल्यावर जीवनमुक्तीचा मार्ग खुला होतो.

**सर्व प्राणिमात्रांचा विचार** - पुरूष व प्रकृती ही दोन मूलतत्वे मानलेली आहेत. पुरूष हे शुद्ध तत्व असून अहंकाररहित आहे. प्रकृती हे विश्वाच्या निर्मीतीसाठीचे सक्रीय तत्व मानले आहे, ज्यातून अहंकार निर्माण होतो. प्रकृतीच्या सर्व युक्तीवादांवरूनच पुरूषाचे अस्तित्व सिद्ध होते.

भगवद् गीतेमध्ये सांख्य व योग या दोन्ही दर्शनांचा एकत्र व एकसारख्या पद्धती असा उल्लेख केला आहे. खरे पाहिले असता, सांख्य, योग व वेदांत ह्या तीनही दर्शनांचे गीतेमध्ये सुंदर पद्धतीने एकत्रीकरण झाले आहे. त्यांच्या वेगवेगळ्या सीमा दाखविता येत नाहीत.

**सांख्य दर्शनातील अनेक तत्वे -** त्रिगुण ( उपनिषदामध्येही याचा उल्लेख आहे), महत् (प्रकृतीपासून निघालेले पहिले तत्व), बुद्धी (वैश्विक आणि मानसिक दोन्ही), तन्मात्रा ( शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध) इत्यादि सर्वांचा समावेश आहे.

सर्व संत, द्रष्टे, योगी सांख्य आणि योग एकच मानतात. सांख्य दर्शन व त्यातील २५ तत्वे ही तर्क, बुद्धी आणि ज्ञान यांनी परिपूर्ण आहेत. योग हे सांख्य दर्शनाची तत्वे क्रियाशील करते. सांख्य हे तत्वज्ञान व योग हे त्यावर आधारित क्रियाशीलता दर्शविणारे तत्वज्ञान आहे असे म्हणता येईल. सांख्यामध्यील त्यागभावना व योगामधील नि:स्वार्थता याची एकवाक्यता होऊ शकते. सांख्य दर्शन प्रमाणित ज्ञानमार्ग हा भक्तीमार्ग व कर्ममार्ग याप्रमाणेच परमतत्वाकडे नेणारा एक राजमार्ग आहे. अंतिमत: हे सर्व मार्ग एकमेकास विकसीत करत, एकाच ध्येयाप्रत वाटचाल करतात व प्रातिभज्ञान जागृत झाल्यामुळे परमतत्वाच्या प्रकाशाची चमक अनुभवू शकतात.

गुरूदेव रानडे यांना भगवद् गीतेमध्ये, परमतत्वापर्यंत पोचण्याच्या मार्गाबरोबरच नैतिक मूल्ये ही अंतर्भूत आहेत असे नमूद करायचे आहे. गीतेतील स्थितप्रज्ञाचे वर्णन ते नैतिकतेच्या तीन पातळ्यांवर करतात; नैतिकता, अतिनैतिकता व आनंदमयता. आनंदमयता ही सर्वोच्च पातळी असून तेथे आनंद व शांती कायमस्वरूपी रहाते. स्थितप्रज्ञ सर्वोत्तम असून तो देहापासून, इतर सर्वांपासून अलिप्त राहून अध्यात्मिक व नैतिक दृष्ट्या, यापलीकडील परमानंदाची स्थिती अनुभवतो.

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– II Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

**निष्कर्ष:**

गुरूदेव रानडे यांच्या साक्षात्कारवाद व त्यातील सर्वोच्च अशी आनंदमयता, तसेच या तत्वज्ञानाची तर्कशुद्धता आणि बुद्धिप्रामाण्य यावर आधारलेली सिद्धांताची मांडणी, ( Rational Mysticism), हे सर्व आजच्या युगात, सुमारे १०० वर्षांनंतरही मार्गदर्शी ठरणारे आहे असे ठामपणे वाटते. वेदांत तत्वज्ञान हे आधारभूत मानता येते. मुख्यतः साक्षात्काराकडे नेणारा मार्ग याच तत्वज्ञानाचा गाभा आहे.

सांख्य तत्वज्ञान हे त्यांच्या तर्कशुद्ध, बुद्धीप्रामाण्य व वैज्ञानिक दृष्टीकोनाचा आधार मानता येते. अशा प्रकारे वेदांत व सांख्य या दोनही तत्वज्ञानांचा प्रभाव गुरूदेवांच्या तत्वज्ञानावर दिसतो.

आपल्या संपूर्ण जीवनात त्यांनी सर्वेक्षणानुसार असे सिद्ध केले कि, साक्षात्कार हा कोणत्या एका संस्कृती, वा मान्यता वा धर्म यापुरता मर्यादित नाही, तर तो सर्वत्र सारखाच आहे. पौर्वत्य तत्वज्ञान हे व्यापक व अनंत काळापासून अस्तित्वात असून पूर्णपणे विकसित झालेले आहे व त्यात अनेक ऋषी, मुनी, द्रष्टे, संत इ. सर्वांना झालेल्या अंतर्ज्ञानाचा समावेश आहे. म्हणूनच पौर्वात्य व पाश्चिमात्य तत्वज्ञानाचा समन्वय घडवू आणण्याचे कार्य भारतीय तत्वज्ञ करू शकतील असा विश्वास वाटतो.

भारतीय स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षात गुरूदेवांच्या तत्वज्ञानाचा अधिक सखोल अभ्यास व्हावा असे वाटते. म्हणजे त्यांनी पाहिलेल्या "सर्व मानवजातीसाठी एक जग, एक धर्म" या संकल्पनेची रूजवात होऊ शकेल. याकरिता त्यांच्या साक्षात्काराच्या मुख्य सिद्धांताची सार्वत्रिकता उपयोगी होईल. ह्या येणाऱ्या काळात, मानवजातीच्या उत्कर्षासाठी, शांतता व आनंद प्रस्थापित होण्यासाठी या तत्वज्ञानावर अधिकाधिक संशोधन करून ते आचरणात आणण्याचे प्रयत्न व्हावेत हीच सदिच्छा.

॥ॐ शांतीः शांतीः शांतीः ॐ॥

**Cite This Article:**

** प्रा. अनघा गोडसे, (2022)* गुरूदेव रानडे यांच्या साक्षात्कारवादाच्या तत्वज्ञानावर वेदांत व सांख्य दर्शनांचा प्रभाव, ***Electronic International Interdisciplinary Research* Journal,** *Volume No. XI (Special Issue-II), 111-115.*